## प्रकरण चौथे

# समारोप



## प्रकरण चौथे
# समारोप आणि निष्कर्ष

मराठी काव्य संपन्न व समृद्ध करण्यात केशवसूत संप्रदाय व रविकिरण मंडळाचा फार मोठा वाटा आहे. इंग्रजी वाङ्मयाच्या संस्काराने त्यांनी स्वच्छंदवादी कविता मराठीत रूढ केली. त्यांच्या अनुकरणाने व संस्काराने अनेक लहान-मोठे कवी प्रभावित झाले आणि त्यांनीही आपापल्या परीने मराठी कवितेच्या समृद्धीला हातभार लावला. जिल्हा स्तरावरील अनेक कवींनी जी काव्यरचना केली ती निश्चितच गुणाने थोर कवींच्या तोडीची होती, परंतु पुणे, मुंबई परिसरांमध्ये अशा कवींना फारशी प्रसिद्धी न मिळाल्याने त्यांची कविता उपेक्षित राहिली. अशा उपेक्षित कवीं पैकी एक कवी म्हणजे सोलापूरचे रा. ना. पवार. जन्मजात प्रतिभा लाभलेल्या या कवीने सातत्याने ६0 वर्षे काव्यरचना केली. हजारो कविता लिहिल्या. त्यातील काही कविता गेय असल्याने त्यांच्या रेकॉर्ड्स निघाल्या त्या रेकॉर्डस् खूप गाजल्याही पण कवी मात्र उपेक्षितच राहिला. म्हणून लघु-प्रबंधाच्या अभ्यासासाठी हा कवी निवडला.

सोलापूरचे कवी रा. ना. पवार यांनी हजारो कविता लिहिल्या असल्या आणि महाराष्ट्रातील अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रकाशित झाल्या असल्या तरी त्यांच्या मृत्युनंतर काही कवितांचा 'सावळ्या विठ्ठला' हा एकमेव काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यापूर्वी त्यांची भारत-चीन युद्धाच्या प्रसंगी लिहिलेली व गाजलेली 'संग्रामगीते' प्रकाशित झाली. त्यांच्या या दोन काव्यसंग्रहाच्या आधारे विशेषतः 'सावळ्या विठ्ठला' या त्यांच्या काव्यसंग्रहाच्या आधारे त्यांच्या काव्यप्रकृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न या निमित्ताने केला आहे. रा. ना. पवार यांची कविता आत्मनिष्ठ असल्याने त्यांच्या कवितेवर त्यांच्या जीवनाचा प्रभाव पडला असे म्हणून या लघु-प्रबंधात त्यांच्या जीवनचरित्राची माहिती गोळा करून त्या आधारे त्यांच्या काव्यप्रकृतीची मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या काव्याची ही वैशिष्ट्ये आढळतात त्यांचा निष्कर्ष पुढील प्रमाणे-

**निष्कर्ष :**

१) कवी रा. ना. पवार यांचा जन्म एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांची कौटुंबिक परिस्थिती नेहमीच अस्थिर आणि बिकट राहिली, परंतु याही परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. त्यांचे मेव्हणे श्री. इंगळे मास्तर याच्यामुळे त्यांना साहित्याचा गंध लागला आणि त्यांच्याकडून त्यांना साहित्य लेखनाची प्रेरणा मिळाली.

२) शालेय शिक्षण घेत असताना त्यांनी साहित्याचे वाचन केले. तसेच शालेय नियतकालिकांतून लेखनही केले. त्यावेळी प्रशालेतील शिक्षक श्री ताटके यांनी त्यांना लेखनांतील शब्दांची ओळख करून दिली. शब्दकोश वाचावयास दिले. त्यामुळे ते शब्दांच्या प्रेमात पडले. यांचा परिणाम त्यांच्या सबंध आयुष्यावर झालेला दिसून येतो. त्यांची 'नजर' कविता पाहिली की त्याचा प्रत्यय येतो.

३) सोलापूरला एक कवी परंपरा आहे. शुभराय महाराज, कविराय रामजोशी, कवी कुंजविहारी, कवी संजीव तसेच आधुनिक काळात दत्ता हलसगीकर, लक्ष्मीनारायण बोल्ली, चंद्रभूषण कुलश्रेष्ठ अशा अनेक कवींच्या कविता महाराष्ट्रभर सातत्याने गाजत आहेत. या कवींमध्ये रा. ना. पवारांचे महत्त्वाचे स्थान आहे.

४) बालपणी ऐकलेल्या भजन-किर्तनामुळे रा.ना. पवारांच्या मनावर भक्तिकाव्याचा बराच परिणाम झालेला आहे, हे त्यांनी लिहिलेल्या अभंग, ओवींवरून दिसून येते. संतकाव्याचे अनेक संस्कार झाल्याने त्यांनी उत्कट प्रकारची भक्तिकाव्ये लिहिलेली आहेत. पण त्यांची भक्ती कोणत्याही सांप्रदायिक मतांशी नसून सृष्टीचा विधाता असणाऱ्या एका परमेश्वरावर त्यांची श्रद्धा आहे. परमेश्वर हा निर्गुण निराकार असून तो सामान्यांसाठी सगुण रूपात अवतरतो. साऱ्या सृष्टीत तो अव्यक्त रूपात आहे,तसेच त्यांनी विठ्ठलाचा 'नाममहिमा'ही सांगितला आहे. आणि सोलापूर परिसरातील संतांचा महिमाही उत्कट भक्तिभावनेतून रेखाटला आहे. तसेच कविराय रामजोशी यांच्या शाहिरी काव्यांचाही परिणाम झाल्याने रा. ना. पवारांने उत्कट प्रकारच्या लावण्या व पोवाडे लिहिल्याचे दिसून येते.

५) शालेय जीवनात त्यांच्या मनावर राजकीय आंदोलनाचा परिणाम झाला होता. सोलापूरचा 'मॉर्शल लॉ', 'सोलापूरच्या चार हुतात्म्यांना फाशी', '१९४२ चा लढा', याचा परिणाम झाल्याने त्यांच्या तरूण मनाने आंदोलनात कधी प्रकट तर कधी भूमिगत भाग घेतले. याचा परिणाम असा झाला की, राजकीय जाणीव त्यांच्या मनात निर्माण झाली व सातत्याने राष्ट्रीय भावना त्यांच्या मनात जागरुक राहिली, म्हणून स्वातंत्र्यपूर्वकाळातील काही घटनांवर आणि स्वातंत्र्यानंतरच्या काही घटनांवर काही कविता लिहिल्या. भारत-चीन युद्धाच्या वेळी त्यांनी लिहिलेल्या 'संग्रामगीते' ही त्यांच्या राष्ट्रीय भावनेची द्योतक आहे. मातृभूमी, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राष्ट्रीय पुरुष यांच्याविषयी त्यांनी लिहिलेली गौरव गीते त्यांच्या मनातील राष्ट्रीय भावना दाखवतात. यांची राष्ट्रीय भावना अनुकरणातून आलेली नसून अनुभवांतून आली आहे, तथापि आचार्य अत्र्यांच्यावर आणि महाराष्ट्रावर प्रेम करणाऱ्या या कवींने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर

मात्र का लिहू नये? हा एक अस्वस्थ करणारा प्रश्न आहे.

६) रा. ना. पवारांचे कौटुंबिक जीवनावर प्रेम आहे. आई, वडिल,भाऊ, बहिण, मुलगी, पती, पत्नी हे नात्याचे संबंध त्यांना महत्त्वाचे वाटतात. ऋणानुबंधाच्या नात्यातील कर्तव्यपरायणता ही त्यानी चित्रीत केले आहे. तसेच पती-पत्नीतील अवखळ व शालीन पण नर्म शृंगार परंपरेचा व संस्कृतिच्या चौकटीत बसून रेखाटले आहे. वात्सल्याने ओतप्रोत भरलेली 'लेकीची लावणी' एक सुंदर कविता त्यांनी लिहिली आहे. पण अनेक सामाजिक कवितांतून हे नात्याचे संबंध तुटत चाललेले आहेत. याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली आहे.

७) रा. ना. पवारांनी आत्मनिष्ठ भूमिकेतून कविता लिहिल्या असल्या तरी ते केवळ आपल्या वैयक्तिक सुखदुःखात रममाण होत नाहीत. त्यामुळे वस्तुनिष्ठ भूमिकेतून त्यांनी त्यांच्या विचारमंथनातून व अनुभवविश्वातून बदलत्या समाजचित्रणाबरोबर समाजजीवनातील दुःख, दारिद्र्य,विषमता, अन्याय याचेही आत्मियतेने चित्रण केले आहे. समाजातील विषमतेचे कारण माणसाच्या मनाला आलेली 'मरगळ' व रुढीचे 'गरळ' या गोष्टी कारणीभूत आहेत. तसेच प्रलोभनांमुळे माणसाच्या मनाबरोबर पर्यावरण प्रदूषणासारखी आधुनिक समस्या त्यांनी मांडली आहे. 'तोवर क्रांती अटळ आहे', 'आज भोंगा वाजत आहे', 'माझा गुरू', 'मुंबईची चाळ' या कविता पाहिल्या की, त्यांची सामाजिक जाणीव किती उत्कट होती याचा प्रत्यय येतो. तसेच 'पुतळा संस्कृती'वर त्यांनी केलेले भाष्य त्या दृष्टीने अर्थपूर्ण आहे. समाजातील आजच्या दंभ, स्वार्थी वृत्ती, ढोंग, धंदेवाईकपणा, यांचे त्यांनी अनेक कवितांतून उपहासाने केलेले चित्रण अर्थपूर्ण आहे.

८) रा. ना. पवार यांच्या जीवनात दुःख, दारिद्र्य, व्याधी असे अनेक संकटे आली. जीवनाचा आनंदापेक्षा दुःखाचाच अनुभव त्यांना अधिक आला असला तरी त्यांचे जीवनावर उत्कट प्रेम आहे. त्यांनी सतत आशेची, आव्हानाची व पराक्रमाची गाणी गायिले आहेत. जीवनाचा सारीपाट मांडताना जय पराजय आसणारच. पराजयाने निराश न होता व जयाच्या उन्मादाने हुरळून न जाता जीवनाचे गाणे गाणाऱ्या कवींच्या कवितेत जीवनचिंतनही आढळते. 'कुठून आलो कुठे जायाचे?' या सारख्या कवितेतून काहीसा निराशेचा सूर आढळत असला तरी त्यांचे जीवनावर प्रेम आहे. जीवन सुखदुःखाने भरलेले असले तरी ते आनंदाने जगले पाहिजे, फुलविले पाहिजे. अशी त्यांची जीवननिष्ठा आहे. म्हणून त्यांच्या कवितेत आशावादी जीवननिष्ठा आढळते. 'जीवनाचे शिल्प', 'कोंबडा', 'मानहानी' या त्यांच्या कवितांतील आशावादाचा सूर उमटलेला आहे.

९) रा. ना. पवार यांच्या मनात थोर पुरुषांविषयी श्रद्धाभाव आहे. 'लोकमान्य टिळक', 'महात्मा गांधी', 'स्वामी दयानंद सरस्वती', 'आचार्य अत्रे', 'ज्ञानेश्वर', 'रामदास' या व्यक्तिंविषयी त्यांनी लिहिलेली गौरवगीते त्यांच्या मनातील श्रद्धा भावना प्रकट करतात.

१०) रा. ना. पवारांच्या कवितेत मानवतावादी दृष्टीकोन दिसून येतो. त्यांच्या सामाजिक व राजकीय कविता यामधून त्यांनी मानवतेचा पुरस्कार केला आहे. माणसाने माणूस व्हावे; माणसांनी माणसांशी माणसासारखे वागावे अशी त्यांची उत्कट इच्छा आहे; परंतु आजकाल माणसे स्वार्थी झाली आहेत, ढोंगी झाली आहेत, ते माणसाशी पशूसारखे वागतात, म्हणून त्यांना दुःख वाटते व कधी संतापही येतो. त्याचा आविष्कार अनेक कवितांतून व्यक्त झाला आहे. मानवी नैतिक मूल्यांविषयी त्यांना आत्मियता आहे. पण ती मुल्ये आजच्या यंत्रप्रधान व अर्थप्रधान संस्कृतीत उद्ध्वस्त होत आहेत, याची त्यांन खंत वाटते. अनेक कवितांतून त्यांचा आविष्कार झालेला दिसून येतो.

११) रा. ना. पवारांच्या कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे त्यांनी लिहिलेल्या शृंगारिक प्रेमकविता होय. शाहिरी काव्यांचा त्यांच्या मनावर मोठा प्रभाव असल्याने त्यांच्या प्रेमकविता या शाहिरी ढंगाच्या आहेत. काही प्रेमकविता प्रत्यक्षात लावण्या प्रकारच्या आहेत. त्यातून त्यांच्या रसिक मनाचे दर्शन घडते विशेष म्हणजे त्यांच्या प्रेमकवितांतून व लावण्यांतून जो शृंगार आलेला आहे तो कमालीचा संयमपूर्ण आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्यांनी आपल्या प्रेमकवितांतून शालीन शृंगाराचे सुंदर व नाट्यमय चित्रण केले आहे. 'रूप तुझं डोळ्यात', 'स्वर्गसुखाचे दोन क्षण', 'आज पुनवेची रात', 'मी आले आंघोळीला', 'आज नाहीच का बोलायचं' या कवितांतून शालीन शृंगाराचे सुंदर चित्रण आले आहे.

१२) रा. ना. पवार हे आधुनिक काळातील कवी असले तरी त्यांच्या मनावर प्राचीन काळातील संतकाव्याचा व शाहिरी काव्याचा फार मोठा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांची कविता पारंपारिक वाटते; तथापि आधुनिक नवकाव्यांकडे ते उपेक्षेने पाहत नाहीत. त्यांनी अभंग, ओवींतून भक्तिकाव्य लिहिले, लावण्या, पोवाडे लिहिले. त्याचप्रमाणे मुक्तछंद, गझल या प्रकारांतूनही रचना केलेली आहे; परंतु त्यांचा कल जुन्या काव्यांकडे अधिक आहे. त्या दृष्टीने 'मुलगी दाखवावी म्हणतो' ही कविता लक्षणीय आहे.

१३) रा. ना. पवार यांची कविता प्रासादिक अधिक आहे. साध्या, सोप्या सरळ भाषेत ते काव्यात्मक अभिव्यक्ती करतात. त्यांची भक्तिगीते जी गाजली ती प्रासादिक भाषेमुळे. क्लिष्ट, दुर्बोध

रचना ते करीत नाहीत. विचारांची, भावनांची, गुंतागुंत त्यांच्या कवितेत आढळत नाही. त्यामुळे त्यांची कविता सर्वसामान्य माणसाला कळणारी सुबोध आहे. त्यांचे काव्य ध्येयवाद, राष्ट्रवाद, समाजवाद, क्रांतीप्रवणता, मानवतावाद, भावनात्मकता व आवश्यक कल्पकता तसेच सूचक नाट्यमयता या ठळक वैशिष्ट्याने नटलेले आहे.

१४) रा. ना. पवारांची कविता सुबोध व प्रासादिक असली तरी ती काव्यमय वाटते. कारण त्यांच्या कवितेतील शब्दांना रस, नाद, लय, ताल आहे. गेयता हे त्यांच्या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्या दृष्टीने त्यांची भक्तिगीते, लावण्या, पोवाडे, गौरवगीते, संग्रामगीते पाहाण्यासारखी आहेत. आपल्या कवितेतील आशयानुसार, भावनेनुसार ते गेय शब्दांचा वापर करतात. बालपणी शब्दकोशाच्या आधारे त्यांना जो शब्दांचा छंद जडला त्याचा प्रभाव या गेय कवितेतून आढळून येतो. 'नजर' सारखी कविता पाहिली की त्यांचे शब्दावर किती प्रभुत्व होते याची जाणीव होते.

१५) रा. ना. पवार यांनी आपल्या प्रासादिक व गेय कवितांतून विविध भावनांचा आविष्कार केला आहे. त्यांच्या भक्तिगीतांतून भक्तिभावनेची आर्तता, लावण्यांमधून शृंगाराची उत्कटता, पोवाड्यांमधून राष्ट्रीय भावनेची ओजस्विता व्यक्त झालेली दिसून येते. भक्ती, शृंगार, वीर व करुण या रसांचा आविष्कार अनेक कवितांतून झाला आहे. विशेष सामाजिक व राजकीय कवितांतून जो उपरोध भाषेचा उपयोग केला आहे. तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यातून संतापाची भावना व्यक्त होते व विनोदातील मिश्किलपणाही जाणवतो. आणखी एक विशेष म्हणजे लावणीतून केवळ शृंगाराची भावना उत्कटपणे व्यक्त करता येते असे नाही, तर वात्सल्यासारखी भावनाही तितक्याच उत्कटपणे व्यक्त करता येते. हे त्यांनी 'लेकीच्या लावणी'तून दाखविले आहे. या कवितेच्याद्वारे त्यांनी शृंगारिक लावणीचा संकेत मोडून वात्सल्याने ओथंबलेली लावणीचा एक नवा प्रयोग यशस्वी केला आहे, असे म्हणावेसे वाटते.

१६) रा. ना. पवारांनी आपल्या कवितेसाठी साधी, सोपी व सुबोध भाषाशैली वापरली आहे. काही कवितांत त्यांनी संस्कृत शब्दप्रयोग अधिक वापरले आहेत, परंतु मराठमोळी भाषाशैली हे त्यांच्या कवितेचे खरे वैशिष्ट्य आहे. लावण्या व पोवाडे या कवितांतून त्यांनी जो बोलीचा वापर केला आहे, तो अधिक प्रभावी वाटतो. आशय व अभिव्यक्ती या दृष्टीने त्यांनी ग्रामीण बोलीचा फार चांगला उपयोग केला आहे. त्यामुळे ग्रामीण बोलींच्या कविता प्रभावी वाटतात. अशा प्रकारच्या त्यांनी अनेक कविता लिहिल्या असत्या तर ग्रामीण साहित्यात मोलाची भर पडली असती व निश्चितपणे ग्रामीण साहित्यात त्यांना स्थानही मिळाले असते, असे म्हणावे वाटते. 'लेकीची लावणी', 'रूप तुझं डोळ्यात', 'आज पुनवेची रात', 'मी आले आंघोळीला', 'पावना

मी खेड्यामधला', 'माझा गुरू', 'मुंबईची चाळ' या कविता भाषाशैलीच्या दृष्टीकोनातून अर्थपूर्ण वाटतात.

१७) रा. ना. पवारांनी आपल्या कवितेत कल्पनाविलासाचा फारसा वापर केला नाही हा काहीसा दोष वाटतो. फार थोड्या कवितांमध्ये कल्पनाशक्तीची झलक दिसते, बाकीच्या कविता कल्पनाविलासापासून अलिप्त आहेत. कल्पनाविलासामुळे कवितेतील आशय कलात्मक बनतो पण त्याची त्यांनी उपेक्षा केली आहे. असे जाणवते.

१८) कवी रा. ना. पवार यांची कविता काही वेळेला संवादात्मक रूपधारण करते. बराचशा कविता कुणाला तरी संबोधून वक्तृत्वाच्या शैलीत त्यांनी लिहिलेल्या आहेत. रा. ना. पवारांच्या व्यक्तिमत्त्वात नाट्यप्रेमाचा एक भाग होता. त्याचा हा संस्कार असावा. त्यामुळे त्यांच्या कवितेत संवादात्मकता, नाट्यमयता व वक्तृत्वशैली आढळते.

१९) रा. ना. पवार यांच्या कवितेत प्रयोगशीलताही आढळते. वेगवेगळ्या काव्यप्रकारांत, वेगवेगळ्या विषयांवर रचना करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. अभंग, ओवी, लावणी, पोवाडे, मुक्तछंद, गझल असे काव्यप्रकार हाताळण्यात त्यांची प्रयोगशीलता दिसते.

२०) रा. ना. पवारांची कविता साधी, सोपी, प्रासादिक व निवेदनात्मक असली तरी त्यांच्या जीवनानुभवातून प्रामाणिकपणे अभिव्यक्त झाली आहे. गेयतेमुळे, नाट्यमयतेमुळे वाचकांच्या मनावर प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. साधेपणातही सौंदर्य असते. हेच त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य होय. ते केवळ हौशी कवी नव्हते तर कवितेवर प्रेम करणारे, कविता जगविणारे एक अभिजात कवी होते म्हणून तर सातत्याने ६० वर्षे ते काव्यरचना करीत राहिले. त्यांची गाजलेली भक्तिगीते, पोवाडे, लावण्या त्यांच्या ठायी असणाऱ्या कवित्वाची जाणीव करून देतात.त्यांच्या अनेक अत्यंत उत्कृष्ट अप्रकाशित कविता प्रकाशित झाल्या तर त्यांच्या कवित्वाचे आणि कर्तृत्वाची प्रचिती येईल.